# <u>मुख्य न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी यांचे न्यायालयात.</u>

**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ४९६/२०२६</u>** निशाणी क्रमांक : — १ लगत

रेल्वे सुरक्षा बल, रत्नागिरी

विरुद्ध

सुशीला धर्माण्णा खेत्री, वय — ५३ वर्षे,
रा.आदर्श वसाहत, कारवांचीवाडी, पोमेंडी, रत्नागिरी.

**<u>अपराध कलम : भारतीय रेल्वे कायदा कलम १४४(१) अन्वये</u>**

तुम्ही दिनांक १४/०४/२०२६ रोजी रेल्वे क्र. १२६१८ मध्ये अनधिकृतरित्या काकडी विकताना मिळून आलात आणि त्यामुळे तुम्ही भारतीय रेल्वे कायदा कलम १४४(१) चा अपराध केलेला आहे.

प्र.१ ला : तुम्हाला केसच्या नकला मिळाल्या काय ?
उत्तर : होय.
प्र.२ रा : तुम्हाला आता गुन्हा समजवून व वाचून दाखविला तो समजला काय ?
उत्तर : होय.
प्र.३ रा : तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तर : होय.

.................
आरोपीची सही

दिनांक :— १०/०६/२०२६

**मुख्य न्यायदंडाधिकारी**
**रत्नागिरी**

## <u>आदेश</u>

आरोपीने स्वेच्छेने गुन्हा कबूल केलेला आहे. तिने प्रार्थना केली आहे की, ती गरीब असल्यामुळे कमीतकमी शिक्षा करण्यात यावी. सदरील आरोपीला पुर्वी कोणताही गुन्हा केल्याचे फिर्यादी पक्षाने सिध्द केलेले नाही. हा तिचा पहिला गुन्हा आहे. सदरील केसमधील कागदपत्र तिने पूर्वी गुन्हा केलेला आहे असे सिध्द करीत नाही. तसेच गुन्हयाचे स्वरूप किरकोळ आहे. त्यामुळे वरील सर्व बाबींचा विचार करून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

आरोपीला बी.एन.एस.एस.,२०२३ चे कलम २७५ नुसार व तिने स्वेच्छेने दिलेल्या गुन्हा कबूली अनुसार भारतीय रेल्वे कायदा कलम १४४(१) अन्वये दोषी ठरवून त्याला रक्कम रुपये १,५००/— (रु. एक हजार पाचशे मात्र) इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा करणेत येत आहे. दंड भरणेस कसूर केलेस एक महिना साध्या कैदेची शिक्षा ठोठावणेत येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SUNAYANA SACHINKUMAR PINGALE
Date: 2026.06.10 15:57:08 +0530

दिनांक :— १०/०६/२०२६

**मुख्य न्यायदंडाधिकारी**
**रत्नागिरी**

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S.M.Jadhav |
| Court Name | :- | The Court of Chief Judicial Magistrate, Ratnagiri |
| Date of decision | :- | 10.06.2026 |
| Judgment signed by PO. on | :- | 10.06.2026 |
| Judgment uploaded on | :- | 10.06.2026 |